PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 2

# इंदिरा संतांचे काव्य : एका वेदनेचा प्रवास
# (मेंदीच्या अनुषंगाने)

**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व
विज्ञान महाविद्यालय, मेहकर,
जि. बुलडाणा महाराष्ट्र भारत

**प्रास्ताविक :**

इंदिरा संतांच्या काव्याचा समावेश सौंदर्यवादी नवकाव्याच्या परंपरेत मोडणारा आहे. 'मेंदी' या त्यांच्या काव्यसंग्रहातून सौंदर्यात्मक भावनेचा प्रत्यय येतो. नवकाव्याच्या अभिव्यक्तीत केवळ अनुभव मांडलेला किंवा वर्णन केलेला नसतो तर संवेदनांच्या अनुभवामुळे अंत:करणात निर्माण झालेल्या स्पंदनांची अभिव्यक्ती असते. त्या संवेदनाही रुपरसगंध यांनी युक्त असल्यामुळे काव्यातील त्यांची अभिव्यक्ती मिश्र स्वरुपाची असते. इंदिराबाईंच्या काव्यात अनुभूतीचे जे विश्व प्रकट झाले आहे त्याची मर्यादा ही त्यांच्या व्यक्तीजीवनापुरतीच आहे आणि तरी देखील त्यांचे काव्य वाचल्यानंतर काहीतरी विलक्षण भावनेने ओथंबलेले, उत्कट, समृध्द काव्य वाचल्याचा अनुभव आपल्याला येतो. ही उत्कटता आणि समृध्दी त्यांच्या काव्यात येण्यास जी कारणे आहेत त्यापैकी काव्यात व्यक्त झालेले प्रियकराचे म्हणजे पतीचे व्यक्तिमत्व. आपल्या दिवंगत पतीच्या सहवासातले अनेक क्षण इंदिराबाईंनी काव्यात साकार केले आहेत. इंदिरा संतांचे काव्य हे त्यांच्या आत्मनिष्ठ व्यक्तिमत्वातून निर्माण झाले आहे. त्यांचे व्यक्तिमत्व आत्मनिष्ठ आहे याचा अर्थ ते संकुचित आहे असे मात्र नाही. जीवनातील सारा आनंद, सारे दु:ख त्यांना त्यावेळी जाणवते की, जेव्हा तो आनंद, ते दु:ख त्यांचे होऊन येते. आंतरिक वेदनेच्या विविध छटा त्यांच्या काव्यात दिसतात. या वेदना त्यांच्या काव्याच्या गर्भस्थानी राहिल्या आहेत. 'मेंदी' मध्ये इंदिराबाईंच्या आंतरिक वेदनांचा आविष्कार कसा झाला आहे, त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

पतीनिधनानंतर त्याच्या आठवणीच्या विविध भावनांच्या छटांनी इंदिराबाईंचे काव्य रंगून गेले आहे. विश्व व्यापून राहिलेला प्रियकर कवयित्रीच्या सर्व भावभावना उचंबळून आणतो. कवयित्रीचे मन सदा त्याला शोधत असते. विरहाच्या तीव्र वेदनांची जखम भळभळत राहते. अंत:करणाची सूक्ष्म भावना भीतीने उघडी पडते. प्रीतीचा अंत:करणातील खोलवर असलेला टाका उसवून येतो. या दु:खातून सुटका नाही. त्यातून सुटका झाली तरी तो भास असतो, ते दु:ख आपल्याबरोबरच नष्ट होईल असे तिला वाटत राहते. प्रीतीची ही जखम अबोलपणे

सोसण्यातच महत्व आहे. पतीशिवाय जीवनाचा दीर्घ प्रवास एकाकीपणे आक्रमित जाण्याच्या कल्पनेने झालेली विव्हळ वृत्ती त्यांच्या काव्यातून प्रकट होते. पतीच्या विरहाने आर्त होऊन उचंबळून आलेल्या भावना बोलून तरी कोणाला दाखवायच्या? मनाचा कोंडमारा सहन करता करता सारे दु:ख आतल्या आत दाबता दाबता, ते अनावर होऊन साऱ्या आठवणींसहीत बाहेर पडते.

**ती कहाणी ………… ती स्वप्नें**

**ती आशा ………… ती स्मरणे**

**तें सारें …………………………… [१]**

अगदी सांकेतिक अर्थाने जाणवणारी भाववशता बाईच्या काही काव्यात जाणवते. निवडुंगाच्या शीर्ण फुलांचे लालसर झुबे कानात घालून पदर खोचून करवंदीच्या जाळीत शिरावे, चढणीवरचा भणभण वारा, गालावर भुरभुरणाऱ्या बटा आणि जिभेवरला आंबटकच्चा स्वाद अनुभवावा. बरोबर कुणीही नसावे. डोंगराच्या चढणीवर एकटीनेच फिरावे–बालपणातल्या त्या आठवणींनी कवयित्री व्याकुळ होते आणि विचारते,

**पुन्हा कधिं न कां मिळायचें ते ..**

**ते माझेंपण … आपले आपण ;**

**झुरते तनमन त्याच्यासाठी**

**उरते पदरी तीच आठवण [२]**

बालपणीच्या स्मृती आणि ते सौख्य पुन्हा मिळणार नाही या व्यथेची सांकेतिक भाववशता या काव्यात व्यक्त झाली आहे. कधी संसारात भीषण भोवरा निर्माण होतो आणि त्यात मन गरागरा फिरू लागते, कधी निराशेच्या वाऱ्याने मनाची केळी उन्मळून पडते. त्यामुळे रात्र पडली की, मन घाबरून जाऊन सशाप्रमाणे लपून बसते. अकारण निर्माण होणाऱ्या भीतीच्या संवेदनांच्या एका क्षणाची जाणीव 'भयभीत' या कवितेत दिसते. हरवलेल्या प्रियकराचा शोध घेताना झालेली मनाची विध्द अवस्था 'भोवरा' या कवितेमध्ये आली आहे. एकटेपणाच्या जाणिवेने तळमळणारे, भयाकुल वृत्तीमुळे बावरून जाणारे मन भूतकाळातील गहिऱ्या अनुभूती स्वत:शी जपून ठेवते, पुन:पुन्हा त्यांची उजळणी करते. पेल्यातल्या त्या जळत्या रसायनाची चटक एकदा जिवाला लागली आहे आणि कल्पनेत तो प्याला पुन्हा ओठाशी नेत असताना त्या सुखद स्मृती मनात अनुभवीत असतानाही, हे सारे खोटे आहे, उरफाटे आहे या जाणिवेने मनाची झालेली तगमग अनेक कवितांमधून दिसून येते. आयुष्याकडे मागे वळून पाहताना ज्या क्षणी काळाची भूत आणि भविष्य अशी विभागणी झाली, त्या क्षणाच्या जाणिवेने येणारी बधिरता त्यांच्या 'मघाशीच की'

या काव्यात प्रकट झालेली दिसते. कितीतरी वर्षे झाली असतील – पण नुकताच घडल्यासारखा जाणवणारा तो अनुभव वास्तवाच्या जाणिवेने अधिकच दु:खदायक ठरतो आणि त्या अनुभूतीचा अंत

**हें खोटें तर ........**

**उभा इथे तूं ......... हे खोटे तर !**

**पिवळ्य गवती पात्यावरती**

**ओघळलेल्या थेंबावरचा**

**रंगच हा तर ......** [३]

**असा करुण होतो.**

इंदिराबाईंच्या काव्यात जे विश्व प्रकटले आहे, ते लहान असले तरी त्यांचे स्वत:चे आहे. त्यातील संवेदना, जाणिवा ज्या स्पर्शरुपरसगंधासहित प्रकटल्या आहेत, ते सारे इंदिराबाईंचे आहे. त्यात प्रकट झालेल्या भाववृत्ती त्यांच्या स्वत:च्या आहेत. या सर्वांचा मिळून आविष्कार जेव्हा होतो, तेव्हा त्याचा बनलेला घाट अपरिहार्य असतो. ज्या काव्याच्या आविष्कारात इतकी अपरिहार्यता असेल ते काव्य स्वत्वपूर्ण मानले पाहिजे.

कधी भूत आणि भविष्य या दोहोंमध्ये तोल सावरून उभे असताना काहीतरी होईल, काहीतरी घडेल आणि आपण यातून मुक्त होऊ अशी जिवाला आस लागलेली दिसते. खिळलेल्या पावलांनी आणि गिळलेल्या लाख स्वरांनी रात्र क्षितिजाच्या काठावर उभी आहे. तोल कसा सावरला आणि बोल कसा आवरला हे तिचे तिला एकटीलाच ठाऊक आहे. तिच्या गिळलेल्या बोलाची आणि खिळलेल्या तोलाची शपथ तिच्या ओठावर आहे आणि त्या शपथेचा रंग कवयित्रीच्या ओठावर चढत आहे, अशा शब्दात 'रात्रच की स्तब्ध उभी' या कवितेत हा तोल वर्णन केला आहे. परंतु ही आस बाळगत असताना कधीकधी अंताशिवाय हा काच कधी सुटणारच नाही अशी भकास जाणीव कवयित्रीला झालेली आढळते. जीवनातील कोणत्याच गोष्टीला काही अर्थ नाही – काही असेल तर तो स्मृतीमुळे आहे. त्या स्मृती उभ्या अंतरंगाला बिलगून चालत असतात. लाल धुळीत उमटलेल्या पदचिन्हांचा हिशोब या अंतरंगाने टिपला आहे. अंधारात एकाकीपणे चालत असता आपला प्रियकर आपल्या समवेत चालत असल्याची मनोमन संवेदना हे अंतरंग बाळगीत असते. या स्मृतींनी जीवनात काही अर्थ निर्माण झाला आहे. पण ही तार हातातून निसटली तर काही तरी भयंकर होईल या जाणिवेची घट्ट पकड तिच्या भोवती पडली आहे. जीवन जगत असता, त्यातील व्यवहारात वावरत असता या जीवनापासून, जगापासून अलिप्त असल्याची कठोर जाणीव कधी इंदिराबाईंच्या काव्यात उमटलेली दिसते. कोणत्याच बऱ्यावाईट प्रसंगाने चित्ताचा तोल न ढळेल अशा तऱ्हेची, कडक

तपस्वी स्थितप्रज्ञता त्यात जाणवते. काही वेळा भोवताली घडणाऱ्या कोणत्याच गोष्टीचे भान या अलिप्ततेच्या आणि स्थितप्रज्ञतेच्या पोटी राहिल्यासारखे वाटत नाही. त्यामुळे 'भरली घागर माथ्यावरती, मुळी न कसे उचमळते पाणी' अशी वृत्ती निर्माण होते.

गतजीवनाच्या या अशा सुखद स्मृती कुरवाळताना मनावर एक हर्षद लहर येते, पण त्या जीवनाचे पुजन चालू असतानाच त्यातील आभासमयता लक्षात येऊन स्वप्नढगांच्या मऊ मऊ रंगीत पिसाऱ्यावर रेललेले त्यांचे मन वास्तवाच्या खडकावर कोसळून रक्तबंबाळ होते. स्वत:च त्या जखमा सावरून निश्चयाने पुढे जाण्याची आकांक्षा मनात निर्माण होत नाही तोच पुढे जाण्याचे नेमके अर्थच कोसळून पडलेले असतात. त्या अर्थाकडे स्थितप्रज्ञ निश्चलतेने पाहताना येणारा अपार थकवा आणि सर्वच क्षणांची पटणारी निरर्थकता त्यांच्या काव्याचा विषय होते. आशा व निराशा, स्थितप्रज्ञता आणि बावरलेपण, विकास आणि गतिरुध्दता या परस्परविरुध्द मनोवस्थांचा प्रत्ययपूर्ण खेळ त्यांच्या काव्याच्या अनुभूतीचा विषय होतो.[४]

कुणी तरी एकाएकी तळ्यात खडा फेकल्याने त्यात वलये निर्माण झाली. त्या वलयांनी उभा काठ वेडा केला. पाण्याची तळपातळी क्षणात उलटीपालटी झाली. अंत:करणात घडलेल्या खळबळीची अनुभूती कवयित्री पुढीलप्रमाणे मांडते.

**कसा कुणी एकाएकी**

**खडा फेकला तळ्यत**

**उमटत्या वलयांनी**

**वेडा केला उभा काठ**[५]

असा अनुभव घेत असतानाही अलिप्ततेची सावध जाणीव त्यांची पाठ सोडत नाही. जीवनाकडे स्थितप्रज्ञतेने पाहण्याचा बळेच केलेला प्रयत्न आणि तो जमत नाही या जाणिवेने कोसळून पडताना जाणवलेला अपार शीण काही काव्यात जाणवतो. जीवनाची अंधारी वाटचाल एकाकीपणाने चालत असताना आपल्या पतीची सोबत आपल्याला असते याची जाणीव कवयित्रीला आहे. अंधाराच्या संथ जळातून चालत असताना, स्वाभाविक मर्यादांचे बंधन ज्यांच्यावर पडू शकेल असे आभाळ किंवा रस्ता किंवा शब्दाने जे संज्ञांकित होईल असे काहीही अवतीभवती असत नाही. इंद्रियांनी जाणवणाऱ्या साऱ्या संवेदना गोठलेल्या असतात. अशा वेळी अंतर्मनाला संवेदित करणारी एकच जाणीव असते, पतीबरोबर आपण आहोत ही.

इंदिरा संताचे काव्य भावगर्भ आहे. त्यामुळे त्यांचे काव्य म्हणजे भावचित्रातून बोलकी झालेली त्यांची मानसचित्रे आहेत. संतांच्या भावकाव्यात प्रेमनिराशेची भावना अधिक तीव्र प्रकारची असलेली दिसून येते. या भावनेचा त्यांच्या काव्यावर फारच परिणाम झालेला दिसतो. भावकाव्यात जर कोणती महत्वाची गोष्ट असेल तर ती म्हणजे पंचेद्रियांना आवाहन करण्याची

शक्ती. इंदिरा संतांच्या काव्यावरून याचा प्रत्यय आपल्याला येतो. इंदिराबाईंच्या काव्यमयी जीवनाचा विकास पाहिल्यास त्यांच्या संवेदनक्षमतेची जाणीव होते. शेला, मेंदी, रंगबावरी या काव्यसंग्रहांच्या नावावरून देखील त्यांची संवेदनक्षमता लक्षात येते. प्रत्येक कवीची ही संवेदनक्षमता वेगवेगळी असते. कोणाला ताल किंवा लय आवडेल तर कोणाला रसात न्हाऊन गेल्याने आनंद होईल. इंदिरा संतांच्या काव्यात रंगसंवेदना अधिक प्रभावी आहे. अर्थात रंगासाठी रंग त्यांच्या काव्यात आलेले नाहीत. तर 'भावा' साठी रंग त्यांच्या काव्यात आले आहेत. इंदिरा संतांचे काव्य म्हणजे प्रियकर आणि निसर्ग यांच्यातील झुलता पुल आहे. त्यांची कविता कधी निसर्गाकडून प्रियकराकडे तर कधी प्रियकराकडून निसर्गाकडे झुलत असलेली दिसून येते. प्रेमाचा भाव आणि निसर्गाचे रंग म्हणजे त्यांचे काव्य. अशा प्रकारच्या प्रेमाच्या भावरंगाची व निसर्गाच्या रंगभावाची कविता 'मेंदी' मध्ये खुललेली दिसून येते. प्रियकराच्या स्मृतीने त्यांच्या भावनेची एकतानता होते तर ती भावना निसर्गाशी संवाद करीतच काव्य विश्वात उमलते. मात्र ती उमलताना निसर्ग रंगात ओलीचिंब झालेली असते, ओथंबलेली असते. निसर्गरंगात ओलेती होऊन येते व रसिकाशी अगदी सहजपणे आपले नाते जडवते. इंदिरा संतांच्या काव्यात रंगाची उधळण असली तरी ती केवळ गुलाबी रंगाचीच नाही. किंबहुना गुलाबी रंग त्यांच्या काव्यसंग्रहात फारसा आलेला नाही. 'मेंदी' या काव्यसंग्रहाचे नाव जरी 'मेंदी' असले तरी या मेंदीचा लाल रंग प्रेमाच्या रंगाचा नाही. दु:खाचा काटा टोचल्यानंतर निघालेल्या रक्ताचा लाल रक्तीमाच मेंदीमध्ये दिसून येतो. प्रियकराच्या विरहामुळे कृष्णवर्णाची मेघपटलेच त्यांच्या मानस सूर्याला झाकोळताना दिसून येतात. कृष्णवर्ण असो किंवा हिरवा रंग असो कोणता तरी रंग संगती घेतल्याशिवाय त्यांची भाववृत्ती बोलकी होतच नाही. अशावेळी त्यांची भाषा शब्दांची भाषा उरतच नाही. ती रंगाची भाषा बनते. ती रंगमयी भाषा केव्हा आनंदाचा श्वास घेते; तर केव्हा दु:खाचा निश्वास सोडते. मेंदीचा रंग कृष्णवर्ण आहे. विरहाचे, व्यथेचे, व्याकुळतेचे कृष्णमेघ येथे भरभरून आले आहेत. येथे इंदिरा संतांच्या हृदयाला देखील संध्याछाया भिववीत आहेत. मेंदी ज्याप्रमाणे लावल्याबरोबर खुलत नाही, त्यासाठी काही काळ जावा लागतो. त्याचप्रमाणे मेंदी या काव्यसंग्रहाचेही आहे. पतिनिधनानंतर रेंगाळणाऱ्या स्मृतींनी इंदिरा संतांची भावमेंदी मेंदीत रंगलेली दिसते. कवयित्रीच्या हृदयपटलावरही मेंदी खुललेली आहे. कवयित्रीच्या भावना जेथे तीव्र आहेत तेथे ही रंगसंवेदनाही सुस्पष्ट दिसून येते. जेथे ही भावना तरल आहे तेथे मेंदीचा रंगही विरळ झालेला दिसतो.

प्रियकराने कवयित्रीच्या जीवनात प्रचंड उलथापालथ घडवून आणली आहे. वादळवाऱ्याप्रमाणे त्याने कवयित्रीचे जीवन उलटेसुलटे केले आहे. काळ्यकभिन्न मेघांप्रमाणे त्याने कणाकणातून वीज रूतविली आहे. दुर्गम पाऊस धारांप्रमाणे जलप्रलयातून वाहून नेले आहे. अशा विविध रूपांनी कवयित्रीच्या जीवनात त्याने थैमान घातले आहे. त्याच्या प्रीतीच्या आवेगामुळे तिच्या मानसिक जीवनात क्रांती घडली. पण प्रीतीचे सामर्थ्य काही विलक्षण आहे. ज्या आवेगामुळे 'घुसमटलें मी, जळलें, बुडलें' असे कवयित्रीला वाटते त्याच आवेगाने 'पुन्हा

कशी पण तळहातावर, नवजाता मी भ्यालें....... हंसले!' अशी तिची वृत्ती बनते. पतीच्या कायमच्या विरहाने निर्माण झालेल्या कवयित्रीच्या दु:ख भावनांच्या, वेदनेच्या नाना छटा इंदिराबाईच्या मेंदी या काव्यसंग्रहात आहेत. अगतिकता, हतबलता, ओढ, निष्ठा अशा त्या छटा आहेत. त्यांच्या काव्यात प्रकट झालेली व्यथा, वेदना ही जशी दिवंगत पतीमुळे निर्माण झाली आहे, त्याचबरोबर विश्व व्यापून राहिलेल्या त्या प्रियकराचा शोध घेताना त्यांचे मन विरहाच्या तीव्र वेदनांनी व्याकुळ होते. जीवाचे गगनांगण चांदण्यात नितळ, निळे असते पण त्यावरही जखमेतील रक्ताचा डाग आहे. हे गगनांगण वरून नितळ निळे असले तरी आतून ती जखम वाहती आहे. अंत:करणात खोलवर कुठेतरी असलेला प्रीतीचा टाका उसवल्याने ही जखम झाली आहे. कधी कवयित्री म्हणते, 'रक्ताचा लाल जाळ आणि दु:खाची गडद लाट' आवरीत वर्षेतील संध्येप्रमाणे मी आले आहे. डोळ्यातले अश्रू आणि ह्रदयातील विजेसारखे रक्त सावरीत मी आले आहे. 'धगधगते जीवन हे धरून असे ओंजळीत' अशी ती कशी, कुठून आली आहे हे तिचे तिला कळत नाही. ती आली आहे हेच फक्त तिला जाणवत राहते. 'मेंदी' या काव्यसंग्रहात अशाप्रकारे दिवंगत पतीच्या विरहाने निर्माण झालेली व्यथा हा या काव्याचा स्थायीभाव आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनेक सूक्ष्म छटांनी त्यांचे काव्य रंगले आहे.

## संदर्भ टिपा :

१) इंदिरा संत, मेंदी, मुंबई, पाचवी आवृत्ती १९८९, पृ.क्र. १९

२) तत्रैव, पृ.क्र. ११

३) तत्रैव, पृ.क्र. ५४

४) डॉ.अक्षयकुमार काळे, अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९९, पृ.क्र. ३६६–६७

५) इंदिरा संत, उनि, पृ.क्र. १७